# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र.मुमाआ/नों.क्र.२२०६३७/२२/अ.क्र.४१९०/२५/०१**

**श्री. चेतन कोठारी**
५२, ओसिनिक अर्पाटमेंट,
डॉ. राजाबली पटेल लेन,
ऑफ बी देसाई रोड, मुंबई-२६

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी**
के.बी.भाभा महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय,
आर.के.पाटकर मार्ग, ग्लोबस मॉल जवळ, बांद्रा (प.), मुंबई ४०० ०५०.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा वैद्यकीय अधिक्षक**
के.बी.भाभा महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय,
आर.के.पाटकर मार्ग, ग्लोबस मॉल जवळ, बांद्रा (प.), मुंबई ४०० ०५०.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २४.०७.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

सदर व्दितीय अपिलावर आज दि.२४.०७.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपीलार्थी व विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी यांना सुनावणी नोटीस प्राप्त झाली असून कोणतीही पूर्व सूचना न देता अनुपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा वैद्यकीय अधिक्षक, श्री. डॉ. जयराज आचार्य उपस्थित आहेत.

या अपिला संदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थी श्री. चेतन कोठारी यांनी दि.२१.१२.२०२० रोजी दाखल जोडपत्र-अ नुसार जन माहिती अधिकारी प्रमुख वैद्यकीय अधीक्षक, माध्यमिक आरोग्य सेवा येथे अर्ज दाखल करीत श्रीम. श्वेता शेनॉय ज्या व्हि. एन. देसाई हॉस्पिटल येथे कार्यरत होत्या, त्यांच्या संदर्भात ३ मुद्द्यांची माहिती मागितलेली असून त्यांच्या नेमणूकीचे पत्र, त्यांच्या सेवा कालावधीतील विशेषतः बृहन्मुंबई महानगरपालिकेतील नियुक्तीचा दिनांक व त्यांच्या शालेय उच्च माध्यमिक, पदवी व तांत्रिक शिक्षणासंदर्भातील प्रमाणपत्राच्या प्रतीची मागणी केली असून, उपरोक्त माहिती ही सेवाभिलेख विभाग पूर्व उपनगरे, के बी भाभा रुग्णालय येथे परिरक्षित केली जात असून मागितलेली माहिती अनु.क्र.१ ते ३ याबाबतची

माहिती ही वैयक्तिक स्वरूपाची असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८(१)(J) मधील तरतुदीनुसार देणे शक्य नसल्याचा प्रतिसाद तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी सेवाभिलेख विभाग (पूर्व उपनगरे) यांनी दिलेला आहे. त्याविरुद्ध श्री. चेतन कोठारी यांनी दि.०२.०२.२०२१ रोजी प्रथम अपील अर्ज दाखल केला. यावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा वैद्यकीय अधिक्षक यांनी अनुक्रमांक १ ते ३ याबाबतची माहिती वैयक्तिक स्वरूपाची असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८(१)(J) अन्वये नुसार नाकारलेली आहे. यावर अपिलार्थी श्री. कोठारे यांनी दि.१६.०३.२०२१ रोजी प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज दाखल केलेला असून जाणून बुजून माहिती नाकारत असल्याचा आक्षेप नोंदवित, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८ व ९ मधील कुठल्याच सुयोग्य कलमांचा वापर केला नसून विहित मुदतीत प्रतिसाद देखील दिल्या नसल्याचा आक्षेप नोंदविलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी सेवाभिलेख विभाग (पूर्व उपनगरे) व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा वैद्यकीय अधिक्षक यांनी घेतलेली भूमिका ही परिपत्रक क्रमांक MOM/१८६१ दि.२७.१२.२०१३ नुसार घेतली असून आज झालेल्या सुनावणीत विद्यमान जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी **मा. सर्वोच्च न्यायालयाने स्पेशल लीव्ह पिटीशन क्र.२७७३४/२०१२, गिरीश रामचंद्र देशपांडे विरुध्द केंद्रीय माहिती आयोग या प्रकरणात दि. ०३.१०.२०१२ रोजी दिलेला आहे. या संदर्भात निर्णय देताना मा. सर्वोच्च न्यायालयाने निर्णयपत्राच्या परिच्छेद क्र. १२ मध्ये पुढीलप्रमाणे निरीक्षण नोंदले आहे.** The petitioner herein sought for copies of all memos, show cause notices and censure/punishment awarded to the third respondent from his employer and also details viz. movable and immovable properties and also the details of his investments, lending and borrowing from Banks and other financial institutions. Further, he has also sought for the details of gifts stated to have accepted by the third respondent, his family members and friends and relatives at the marriage of his son. The information mostly sought for finds place in the income tax returns of the third respondent. The question that has come up for consideration is whether the above-mentioned information sought for qualifies to be "personal information" as defined in clause (j) of Section 8(1) of the RTI Act."

**या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने स्पेशल लीव्ह पिटीशन क्र.२७७३४/२०१२, गिरीश रामचंद्र देशपांडे विरुध्द केंद्रीय माहिती आयोग या प्रकरणात दि. ०३.१०.२०१२ रोजी दिलेला आहे. या संदर्भात निर्णय देताना मा. सर्वोच्च न्यायालयाने निर्णयपत्राच्या परिच्छेद क्र. १३ मध्ये पुढीलप्रमाणे**

**निरीक्षण नोंदले आहे.** "We are in agreement with the CIC and the courts below that the details called for by the petitioner i.e. copies of all memos issued to the third respondent, show cause notices and orders of censure/punishment etc. are qualified to be personal information as defined in clause (j) of Section ८(१) of the RTI Act. The performance of an employee/officer in an organization is primarily a matter between the employee and the employer and normally those aspects are governed by the service rules which fall under the expression "personal information", the disclosure of which has no relationship to any public activity or public interest. On the other hand, the disclosure of which would cause unwarranted invasion of privacy of that individual. Of course, in a given case, if the Central Public Information Officer or the State Public Information Officer of the Appellate Authority is satisfied that the larger public interest justifies the disclosure of such information, appropriate orders could be passed but the petitioner cannot claim those details as a matter of right."

तसेच मा.सर्वोच्च न्यायालय यांच्या कॅनरा बँक विरुद्ध सी. एस. श्याम व महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेले दि.१७.१०.२०१४ रोजीच्या परिपत्रकानुसार मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाची वैयक्तिक स्वरूपाची माहिती असल्याचे नमूद केलेले असून, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी सेवाभिलेख विभाग (पूर्व उपनगरे) व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा वैद्यकीय अधिक्षक यांनी घेतलेला निर्णय हा मा.सर्वोच्च न्यायालय यांच्या निर्णयातील दिशा निर्देशावरून व तसेच महाराष्ट्र शासनाच्या दि.१७.१०.२०१४ रोजीच्या परिपत्रकानुसार घेतला असल्याचे नमूद केलेले आहे. व दिलेल्या प्रतिसाद व पारित केलेला आदेश हा सुयोग्य असल्याचे व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील तरतुदींशी सुसंगत असल्याचे नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी श्री. चेतन कोठारी हे उपस्थितीत नाहीत. मात्र दाखल जोडपत्र-अ व ब, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा वैद्यकीय अधिक्षक यांनी पारित केलेला आदेश व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी सेवाभिलेख विभाग (पूर्व उपनगरे) यांनी दिलेला प्रतिसाद याचे अवलोकन केले असता व जोडपत्र-अ मधील मुद्दा क्र.१ ते ३ याचे निरीक्षण केले असता, अपिलार्थी यांनी ज्यांच्या विषयी माहिती विचारली आहे, ती व्यक्ती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवर अर्ज दाखल करण्याच्या दिवशी कार्यरत होत्या व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेकडून त्यांना वेतन प्रदान करण्यात येत होते. ही वस्तुस्थिती लक्षात घेता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम

४(१)(ख) नुसार त्यांच्या नियुक्ती, पदोन्नती तसेच वेतन (वजावट वगळून) माहिती ही देय असल्याची कायदेशीर वस्तूस्थिती लक्षात घेता, तथापि श्रीम.श्वेता शेनॉय या सन २०२२ सालीच सेवानिवृत्त झाल्या असल्याने जर त्यांच्या महानगरपालिकेतील प्रथम नियुक्ती संदर्भातील कागदपत्रे कार्यालयीन अभिलेखात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम २ (च) प्रमाणे उपलब्ध असल्यास त्यांचे सेवा पुस्तक जर संबंधित प्राधिकरणाकडे उपलब्ध असल्यास त्यातील प्रथम पृष्ठ हे माहिती अधिकार अंतर्गत देय असल्याची कायदेशीर वस्तूस्थिती लक्षात घेता, उपरोक्त कागदपत्रांच्या छायांकित प्रती अपिलार्थी विनामूल्य देण्यात याव्यात. यातील मुद्दा क्र.३ यात अपिलार्थी यांनी मागितलेली श्रीम.श्वेता शेनॉय यांच्या शैक्षणिक व तांत्रिक परीक्षांमधील प्रमाणपत्रांची ही मात्र त्यांचे वैयक्तिक स्वरूपाची माहिती असल्याने त्याचा उल्लेख हा सेवा पुस्तकातील नोंदीमध्ये घेतला जात असल्यामुळे व ती आधीच देण्याची आदेश निर्गमित केले असल्यामुळे प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२. वरील अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : २४.०७.२०२५**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission
Maharashtra